पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३० • मे २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

**पुणे महानगरपालिका अधिकारी/सेवकांच्या पाल्यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता दहावी आणि बारावी) परीक्षांमध्ये उत्तुंग यश प्राप्त केले आहे.**

**उत्तीर्ण सर्व पाल्यांचे कामगार कल्याण निधीमार्फत हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भावी कारकिर्दीच्या वाटचालीस शुभेच्छा.**

## १ मे कामगार दिनानिमित्त महाराष्ट्राची लोकधारा - सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

दिनांक १ मे या कामगार दिनी पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचातर्फे बालगंधर्व रंगमंदीर येथे मराठमोळ्या संस्कृतीचा नृत्य, नाटक, गायन यांचा त्रिवेणी संगम साधणाऱ्या महाराष्ट्राची लोकधारा या मनपा सेवकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात समुहगीत, समुहनृत्य, भजन, भारुड, गवळण, जाणता राजा मधील शिवाजी महाराजांचा प्रसंग, जोगवा नृत्य, कोळीगीत नृत्य, मराठी लावणी, गोंधळ नृत्य, पोवाडा, हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम ऑर्केस्ट्रा, इत्यादी कार्यक्रमांद्वारे मनपा सेवकांनी आपली अभिनय कला दाखवून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आणि संचालन श्री.सुरेश परदेशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्टपणे केले. सर्व सहभागी कलाकार व त्यांच्या चमूचे हार्दिक अभिनंदन.





## सह आयुक्त, विभागीय कार्यालय क्र. २ येथे व्यक्तीमत्व विकास व तणावमुक्त जीवन कार्यशाळेचे आयोजन

सह आयुक्त, विभागीय कार्यालय क्र.२ अंतर्गत येणाऱ्या ढोलेपाटील रोड, येरवडा व नगररोड (वडगाव शेरी) क्षेत्रीय कार्यालयांकडील अभियंता व आरोग्य निरीक्षक यांचेकरिता व्यक्तीमत्व विकास व तणावमुक्त जीवन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.




प्रास्ताविकामध्ये श्री. ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त यांनी पुणे मनपामध्ये काम करताना अनेक ताणतणावांना सामोरे जावे लागते, त्यामुळे प्रशिक्षणाची गरज आहे, असे सांगितले.

तणावमुक्त जीवन या विषयाकरिता श्री.शेखर कुंटे, मुंबई यांनी कार्यशाळा घेतली. तणावमुक्ती करण्याचे उपाय व काही कृती त्यांनी करुन घेतल्या. संघबांधणी भावना निर्माण होण्यासाठी चार वेगवेगळ्या खेळातून त्यांनी प्रशिक्षण दिले.

श्री. दत्ता कोहिनकर पाटील यांनी व्यक्तीमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. श्री.कोहिनकर पाटील यांनी तणाव मुक्तीसाठी विपश्यनेची गरज असून साध्यासाध्या गोष्टीतून तुम्ही कसे तणावमुक्त होवू शकते हे सांगितले. या कार्यक्रमाबाबत मा.संदिप ढोले, महा. सहाय्यक आयुक्त, ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालय यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती निलम शिंगाडे, कनिष्ठ अभियंता यांनी व आभार प्रदर्शन मा. माधव देशपांडे, महा.सहाय्यक आयुक्त, नगररोड क्षेत्रीय कार्यालय यांनी केले.

## माहे मे, २०१३ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दि.३१/५/१३ रोजी छत्रपती शिवाजी सभागृह येथे मे, १३ मधील सेवानिवृत्त अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ९८ वयोपरत्वे व ६ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला.



समारंभासाठी मा.विशाल तांबे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा. सुनिल पारखी, नगर सचिव, मा. हनुमंत नाझीरकर, प्रकल्प संचालक, नागरवस्ती विकास योजना, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. जयंत पवार, व्यवस्थापक, मुद्रणालय, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री.वसंत गोडबोले, सरचिटणीस, पुणे मनपा सेवानिवृत्त संघ व मा. तुकाराम जगताप हे उपस्थित होते.

सुरवातीस मा.दौंडकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजनाची भूमिका विषद केली. सेवानिवृत्तांनी आपल्या हातून पुढील आयुष्यात अधिक चांगले काम करण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

मा. तांबे यांनी मार्गदर्शनामध्ये सेवानिवृत्त सेवकांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व कर्मचाऱ्यांनी महापालिकेत रुजू होताना अनेक स्वप्ने पाहिली होती. अनेकांची ती पूर्ण झाली असतील. पालिकेत पूर्ण केलेला सेवाकाल आणि या दरम्यान दृढ झालेले ऋणानुबंध यामुळे अनेक परिवार एकत्र आले. सेवानिवृत्त झाल्यानंतर या सर्व आठवणींची पुरचुंडी घेवून पुढील जीवनात नवीन आशा पल्लवित कराव्यात, तुमच्या अनुभवाचा लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्था यांना लाभ झाला, तर शहर सुधारण्यासाठी त्याचा उपयोग होईल. त्यासाठी योगदान देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी आवाहन केले.

यानंतर सर्व सेवानिवृत्तांना स्मृतिचिन्हे, शॉल व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन केंजळे, सूत्रसंचालन सूर्यकांत चांधेरे व आभार प्रदर्शन सौ.सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले.

## विद्या शिरसचे शरीरसौष्ठव स्पर्धेतील यश

महाराष्ट्र बॉडीबिल्डर असोसिएशनच्या मान्यतेने व पुणे शिवसेना जिल्हाप्रमुख मा.मच्छिंद्र खराडे यांच्या पुढाकाराने लोणावळा येथे भरविण्यात आलेल्या पहिल्या मिस महाराष्ट्र शरीरसौष्ठव क्रिडा स्पर्धेमध्ये पुणे मनपा सेविका श्रीमती विद्या शिरस हिने द्वितीय क्रमांक मिळविला. स्पर्धेमध्ये सुमारे २७ महिला सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेचे पारितोषिक वितरण असोसिएशनचे संजय मोरे यांचे हस्ते झाले.

श्रीमती शिरस यांनी चेन्नई येथे आयोजित केलेल्या आठव्या वुमेन्स फिटनेस चॅम्पियनशिप व शरीरसौष्ठव स्पर्धेत १६३ से.मी.उंचीवरील गटात तृतीय क्रमांक मिळविला आहे. विद्या शिरस हिला ब्रॉन्झ पदकासह स्मृतिचिन्हे देवून गौरविण्यात आले. मा.महेश पाठक, आयुक्त, मा.वैशाली बनकर, महापौर, पुणे व इंडियन बॉडी बिल्डिंग फेडरेशनचे पदाधिकारी श्री.संजय मोरे यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे शिरस यांनी सांगितले. सदर स्पर्धा चेन्नई येथे ७ ते ९ मे दरम्यान संपन्न झाल्या. सौ.शिरस यानी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्रथमच सहभाग घेतला होता. त्यांना सन २००१ मध्ये पॉवरलिफ्टिंग या क्रिडा प्रकारात श्री.शिवछत्रपती पुरस्कार मिळाला आहे.२००१ साली दिल्ली येथील आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले आहे.



बालेवाडी येथे झालेल्या पुणे जिल्हा आंतरकचेरी ॲथलेटिक्स क्रिडा स्पर्धेत १०० मि. धावण्यामध्ये प्रथम व गोळाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. पुणे मनपाच्या वतीने त्यांना हरिश्चंद्र बिराजदार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## विनायक दामोदर सावरकर - जयंतीनिमित्त

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म दि.२८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासून अत्यंत बुध्दिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना यांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. चाफेकरबंधूंना फाशी दिल्याचे वृत्त समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारुन मारिता मारिता मरेतो झुंजेन अशी शपथ घेतली.

मार्च इ.स.१९०१ मध्ये विनायकराव यमुनाबाई यांच्याशी विवाहबध्द झाले. इ.स.१९०२ साली फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. सावरकरांनी पागे आणि म्हसकर या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना स्थापन केली. याच संघटनेचे पुढे अभिनव भारत या संघटनेत रुपांतर झाले. इटालियन क्रांतिकारक आणि विचारवंत जोसेफ मॅझिनी यांच्या यंग इटली या संस्थेच्या धर्तीवर हे नाव दिले गेले होते. सावरकरांनी पुण्यामध्ये इ.स.१९०५ साली विदेशी कापडाची होळी केली. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी इ.स.१९०६ साली सावरकर लंडनला गेले. लंडनमधील इंडिया हाउसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्रांचे मराठी भाषांतर केले. या भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेत सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचे तत्वज्ञान विषद केले होते. इंडिया हाउसमध्ये अभिनव भारताचे क्रांतिपर्व सुरु झाले. मदनलाल धिंग्रा हा सारवकरांचा पहिला हुतात्मा शिष्य. मदनलालने कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याचा वध करुन हसत-हसत फाशी स्विकारली.

इ.स.१८५७ मध्ये इंग्रजांविरुध्द भारतात झालेल्या उठावाचा साधार इतिहास सावरकरांनी लिहिला. अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर हा तो ग्रंथ होय. हा उठाव म्हणजे केवळ एक बंड होय हा इंग्रज इतिहासकारांचा निष्कर्ष सावरकरांनी साधार खोडून काढला. ब्रिटिश शासनाने हा ग्रंथ प्रकाशनापूर्वीच जप्त केला. पण सावरकरांच्या साथीदारांनी तो इंग्लंडच्या बाहेरुन प्रसिध्द करण्यात यश मिळविले. ही या ग्रंथाची इंग्रजी आवृत्ती होती. मूळ मराठी ग्रंथाचे हस्तलिखित सावकरांचे मित्र कुटिन्हो यांनी जपून ठेवले होते. ते भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रसिध्द झाले.

राजद्रोहपर लिखाण प्रसिध्द केल्याचा आरोप ठेवून सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर यांना ब्रिटिश शासनाने जन्मठेपेची शिक्षा देवून काळ्या पाण्यावर पाठविले. या घटनेचा प्रतिशोध म्हणून लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायलीला गोळ्या घातल्या. तर नाशिक येथे अनंत कान्हेरे यांनी नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन याला गोळ्या घालून ठार केले. नाशिकच्या या प्रकरणात वापरण्यात आलेली ब्राउनिंग जातीची पिस्तुले सावरकरांनी चतुर्भुज अमीन याच्याकरवी पाठविली होती. ब्रिटिश सरकारला याचा सुगावा लागताच त्यांनी सावरकरांना तात्काळ अटक केली. समुद्रमार्गाने त्यांना भारतात आणले जात असताना सावरकरांनी फ्रान्सच्या मोर्सेलिस बेटाजवळ बोटीतून उडी मारली. ब्रिटिशांच्या कैदेतून सुटून त्यांनी पोहत फ्रान्सचा समुद्रकिनारा गाठला. पण किनाऱ्यावरील फ्रेंच रक्षकांना भाषेच्या समस्येमुळे सावरकरांचे म्हणणे कळले नाही आणि ब्रिटिश सैनिकांनी त्यांना अटक करुन भारतात आणले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना दोन जन्मठेपांची-काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. दोन देशांतील कैदी हस्तांतरण किंवा अन्य तत्सम करारांचा मुद्दा सावरकरांच्या मनात होता. फ्रान्सच्या भूमीवरुन ब्रिटीश पोलिस त्यांना पकडू शकणार नाहीत असा अंदाज होता. पण तसे घडले नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा तेजोभंग करण्यासाठी ब्रिटीश सरकारने त्यांना अंदमानच्या काळकोठडीत ठेवले. हर प्रकारे त्यांना छळले. खड्या बेडीत टांगले. तेलाच्या घाण्याला जुंपले. नारळाचा काथ्या कुटण्याचे कष्टप्रत काम दिले. या मरणप्राय वेदना सहन करीत असतानाही त्यांच्या डोळ्यासमोर एकच ध्येय होते. मातृभूमीचे स्वातंत्र्य. तब्बल ११ वर्षे हा छळ सहन करीत असतानाही सावरकरांचे सर्जनशील कवित्व आणि बंडखोर क्रांतिकारकत्व तसूभरही कमी झाले नव्हते. बाभळीच्या काट्यांनी त्यांनी तुरुंगाच्या भिंतीवर महाकाव्ये लिहिली.

अंदमानच्या काळकोठडीत सावरकरांना हिंदुस्थानचे बदलते राजकारण दिसत होते. ब्रिटिशांची बदललेली नीती, मुस्लीम लीगचा वाढता मुजोरपणा त्यांना अस्वस्थ करत होता. आज ब्रिटिश हे मुख्य शत्रू राहिलेले नाहीत. ते कधीतरी हा देश सोडून जाणारच आहेत. पण पुढे हिंदू संघटन करणे आवश्यक आहे हे सावरकरांनी ओळखले. विठ्ठलभाई पटेल, रंगस्वामी अय्यंगार यांसारख्या नेत्यांच्या प्रयत्नांमुळे व खुद्द सावरकरांनी मुत्सद्दीपणाने ब्रिटिश सरकारची काही बंधने मान्य केल्यामुळे त्यांची अंदमानातून सुटका झाली.

अंदमानहून सुटकेच्या आधीचे व सुटकेनंतरचे जीवन असे सावरकरांच्या जीवनाचे दोन महत्वाचे भाग पडतात. पहिल्या भागात आक्रमक, क्रांतिकारी सावरकर, क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान सावरकर, धगधगते लेखन करणारे सावरकर - असे त्यांचे रुप दिसते. तर त्यांच्या जीवनाच्या दुसऱ्या भागात समाजक्रांतिकारक सावरकर, हिंदू संघटक सावरकर, भाषाशुध्दी चळवळ चालवणारे व श्रेष्ठ साहित्यिक सावरकर, समाजात प्रेरणा निर्माण करणारे वक्ते सावरकर, विज्ञाननिष्ठेचा प्रचार करणारे आणि हिंदू धर्म आधुनिक स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न करणारे तत्वज्ञ व विचारवंत सावरकर - अशा अनेक स्वरुपात ते समाजासमोर आलेले दिसतात.

## ओळख गुणवंताची - सौ.अनुराधा विजय कोकरे

ओळख गुणवंताची या सदरात आपण सौ.अनुराधा विजय कोकरे, ऑक्झिलरी नर्स यांची ओळख करुन घेणार आहोत.

सौ. अनुराधा कोकरे यांचे बालपण खूप कष्टात गेले. त्यांचे माहेर पंढरपूर. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. आईने दुसऱ्यांच्या घरी काम करुन त्यांचे शिक्षण पूर्ण केले. सौ. कोकरे यांना असलेली कष्टाची तयारी व शिकण्याची आवड यामुळे त्यांनी घरची परिस्थिती बदलता आली. दहावीच्या परीक्षेमध्ये पंढरपुर येथील आपटे प्रशालेत त्या प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. शाळेतील शिक्षकांची मदत व आईचे कष्ट यामुळे त्यांना दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करता आले.

कुटुंबाला आर्थिक मदत करण्याच्या इच्छेने दहावीनंतर के.ई.एम. हॉस्पिटल येथे ऑक्झिलरी नर्सच्या ट्रेनिंगसाठी त्या रुजू झाल्या. परीक्षेमध्ये त्यांना २०० मुलींमध्ये पाचवा नंबर मिळाला. १९८४ मध्ये नर्सिंग कौंसिलच्या परीक्षेत सौ. कोकरे के.ई.एम.मध्ये प्रथम व राज्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. त्यामुळे सर्वांनीच त्यांचे खूप कौतुक केले. त्यांचे आजोळ पुण्यात असल्यामुळे आजीने त्यांना ट्रेनिंगसाठी पुण्यात घातले होते. व्हिलेज बॉण्ड म्हणून दोन वर्षांसाठी त्यांची ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील सायवान या प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांना नोकरी मिळाली. तो भाग अतिशय दुर्गम व आदिवासी भाग होता. खूपच बिकट परिस्थितीत त्यांना या परिसरात काम करावे लागले. १५ कि.मी.पायी जावून सर्वे करणे, गोळ्या वाटप करणे, नसबंदीच्या साधनांचा प्रचार व लसीकरण कॅम्प घेणे यासारखी कामे त्यांना करावी लागत. अशा परिस्थितीतही बदली मागण्याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही. नोकरी मिळाली हेच त्यांच्यासाठी खूप महत्वाचे होते. मिळालेल्या वेतनातून गरजेपुरता खर्च करुन उर्वरित रक्कम त्या घरी पाठवित असत. हळूहळू त्यांच्या घरची परिस्थिती सुधार लागली.

१९८६ साली सौ. कोकरे पुणे महिला मंडळाच्या कुटुंब कल्याण केंद्रात नोकरीस लागल्या. सर्व्हे करताना प्रत्येक घरात गेल्यामुळे लोकांच्या अडचणी समजू लागल्या. ६ वर्षे त्यांनी महिला मंडळामध्ये चांगल्या प्रकारे काम केले व वरिष्ठांना मदत केली. मंडळातील कार्यक्रमात त्यांनी सादर केलेल्या कवितांचे मा. शांता शेळके यांनीही कौतुक केले. सौ. कोकरे यांनी प्रथम लहान बहिण व मोठ्या बहिणीचे लग्न करुन दिले व नंतर स्वत: लग्न केले. लग्नानंतरही त्यांना बराच संघर्ष करावा लागला. १९९१ मध्ये पुणे मनपामध्ये बदली कामगार म्हणून नोकरी मिळाली. परंतु वैवाहिक आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ही नोकरी खूप महत्वाची होती. १९९२ ते ९६ पर्यंत त्यांनी पालिकेच्या दवाखान्यात १५ दिवस, १ महिना, ३ महिने अशी बदली कामगार



म्हणून काम केले. परंतु यामुळे बऱ्याच कामांची माहिती झाली. नायडू हॉस्पिटल येथे ब्रेकवर सलग ४ वर्षे काम केले. तेथेही त्यांना खूप शिकायला मिळाले. जानेवारी ते सप्टेंबर १९९७ पर्यंत ९ महिने ब्रेक दिल्याने त्यांना खूप नुकसान सहन करावे लागले. या काळात त्यांच्या पतीने त्यांना खूप साथ दिली व मानसिक आधारही दिला.

सौ. कोकरे यांना ऑक्टोबर १९९७ मध्ये सोनावणे प्रसृती गृह येथे कायम नोकरीत रुजू करुन घेण्यात आले. तेथे त्यांनी १४ वर्षे नोकरी केली. येथे त्यांना खूप शिकायला मिळाले. पैशाचा योग्य उपयोग होवून स्वत:चे घर घेतले, मुलाला चांगले शिक्षण दिले.

पुणे महानगरपालिकेत सेवा करताना त्यांनी प्रत्येक कार्यक्रमात भाग घेतला, अनेक पुरस्कार व प्रशस्तीपत्रक मिळविले. सौ. कोकरे यांना गायन, लेख लिहिणे, वाचन, पर्यटन याची आवड असल्याने आपला छंद जोपासण्यास त्यांना पतीकडून व मुलाकडून नेहमीच प्रोत्साहन मिळाले. प्रत्येक वेळी पाठीवर थाप मिळाल्यामुळे नवीन काही करण्याची उर्मी वाढू लागली. हालाखीच्या परिस्थितीतून गेल्यामुळे प्रत्येक ठिकाणी तडजोड करणे हा त्यांचा स्वभाव बनला. मिळेल त्या गोष्टीत समाधान मानण्याची वृत्ती निर्माण झाली. ज्या ज्या वेळी शक्य झाले तेंव्हा अडचणीत असलेल्यांना त्यांनी मदत केली. वैयक्तिक जीवनात खूप संकटांना तोंड द्यावे लागल्याने अनुभवांनी त्या परिपक्व झाल्या होत्या.

सध्या सौ. कोकरे यांना आयुष्यात खूप चांगले दिवस आले आहेत. जगात पैसा महत्वाचा असला तरी तो सर्वकाही नाही, असे त्यांचे मत आहे. आज त्यांच्या जवळ सासर, माहेरची माणसं, मित्रपरिवार, सहकारी आणि अडचणीत एक आवाज दिला तर एकावेळी शंभर जण हजर होतील, अशी माणसांची संपत्ती त्यांनी मिळविली आहे.

एकाच अपत्यावर कुटुंब नियोजन केल्यामुळे मुलाचे संगोपन जास्त चांगल्या प्रकारे करु शकतात. त्यांचे शिक्षण व शिक्षणाव्यतिरिक्त तो एक चांगला माणूस कसा घडू शकेल याकडे त्या खूप लक्ष देतात. आपल्याला सोपविलेले काम प्रामाणिकपणे करणे, सहकाऱ्यांशी सलोख्याने संबंध ठेवणे, अडचणीत असलेल्यांना मदत करणे, या गोष्टींमुळे तुम्ही आपोआपच मोठे होता. त्यासाठी वेगळे काही करण्याची गरज लागत नाही असा त्यांचा अनुभव आहे.

नोकरी करत असताना सौ. कोकरे यांनी कौन्सिलिंगचा कोर्स केला. अंगणवाडी, अपंग शाळेतील मुलांना गाणी व स्तोत्र शिकविण्यासाठी त्या जमेल तेंव्हा जातात. निसर्ग सहली, पर्यटन या गोष्टी त्यांना मनापासून आवडतात. अत्यंत काटकसरीने संसार करुन खूप ठिकाणी त्यांनी पर्यटन केले आहे. तिरुपती, वैष्णोदेवी, हरिद्वार, काशी, चारधाम, अष्टविनायक, बारा जोतिर्लिंग, अमरनाथ या सर्व ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या आहेत.

ऑक्टोबर २०१२ पासून सौ. कोकरे गाडीखाना येथे एक्स रे विभागात ईसीजी काढण्याचे काम करतात. सध्या त्यांना किर्तन शिकण्याची इच्छा आहे. परमेश्वर कोणाला काही उचलून देत नाही. परंतु जे प्रामाणिक प्रयत्न करतात त्यांना मदत मात्र नक्की करतो, यावर त्यांचा विश्वास आहे. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन तु तुझे कर्म करीत राहा, फळाची अपेक्षा करु नकोस या श्रीकृष्णाच्या उपदेशाचा मंत्र हे त्यांच्या शाळेचे ब्रिदवाक्य होते आणि ते त्यांनी स्वत: आजपर्यंत जपले आहे. त्याचा प्रत्यय म्हणून पुणे महानगरपालिकेने सन २०११-१२ चे गुणवंत कामगार पुरस्कारासाठी त्यांची निवड करुन त्यांना सन्मानित केले. सौ. कोकरे त्यांच्या नाभिक समाजात उद्योग मंदीर व वधूवर सूचक मंडळात काम करीत आहेत. त्यांना आजवर वरिष्ठांकडून एकही मेमो वा समज देण्यात आलेला नाही. वरिष्ठांशी मतभेद झाले नाहीत. आपल्या उर्वरित सेवेमध्ये रुग्णांना अधिकाधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्याची त्यांची इच्छा आहे. आजपर्यंत जे काही मिळाले ते परमेश्वर, रुग्णांचे आशीर्वाद, आई वडिल, सासु सासरे यांच्या आशीर्वादामुळे मिळाले व आयुष्याच्या शेवटपर्यंत या सर्वांचे प्रेम मिळत राहावे, हीच त्या प्रार्थना करतात.

सौ. कोकरे यांच्या पुढील वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

# पेन्शन मार्गदर्शक पुस्तकांचे वाटप

पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना विहित मुदतीत सेवानिवृत्ती वेतन सुरु करणेकामी सल्लागार (कामगार) कार्यालयातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेत विविध खात्यांकडील प्रलंबित पेन्शन प्रकरणाबाबत मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) यांच्या मार्गदर्शनाखाली मासिक आढावा बैठक आयोजित करण्यात येते. या बैठकीमध्ये प्रलंबित पेन्शन प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येते. तसेच, मा. सल्लागार (कामगार) यांचे मार्गदर्शनाखाली घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय येथे सेवापुस्तके तपासून देणेसाठी समिति नेमण्यात आली आहे.

पेन्शन प्रकरणांची वाढती संख्या व प्रकरणे निकाली काढताना निर्माण होणारे प्रश्न व अडचणी कमी करण्यासाठी श्री. विजय इरप्पा कांबळे, सरलेखनिक तथा कामगार शिक्षक यांनी पेन्शन मार्गदर्शन पुस्तकाचे लेखन केले आहे. सदर मार्गदर्शन पुस्तकामुळे प्रलंबित पेन्शन प्रकरणे वेळेवर व बिनचूक निकाली निघण्यास मदत होईल. श्री. कांबळे यांची पुणे महानगरपालिकेत २९ वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे. सदर पुस्तकाची छपाई सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून करण्यात आली असून, पुस्तकाचे वाटप दिनांक १० मे, २०१३ रोजी पेन्शन बैठकीमध्ये सर्व नोडल ऑफिसर्सना करण्यात आले. तसेच, उर्वरित सर्व खात्यांनाही या पुस्तकाचे वाटप करण्यात आल आहे. त्याचा फायदा निश्चितच सर्वांना होईल व पेन्शन प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघण्यास मदत होईल. सेवानिवृत्ती पेन्शन प्रकरणी श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर, सरलेखनिक व श्रीमती स्नेहल गुद्देटी, ज्युनिअर ग्रेड लेखनिक या सल्लागार (कामगार) कार्यालयाच्या वतीने समन्वयक म्हणून काम पाहात आहेत.

# पुणे महानगरपालिकेमध्ये जागतिक परिचारिका दिनाचे आयोजन

फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचे स्मरणार्थ दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीचे जागतिक परिचारिका



दिनानिमित्त पुणे महानगरपालिके तर्फे दि.१३/५/२०१३ रोजी कमला नेहरु रुग्णालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.एस.टी. परदेशी, आरोग्य प्रमुख यांनी भूषविले. सदर कार्यक्रमासाठी डॉ.अपर्णा क्षोत्री, एम.डी.,डी.जी.ओ. यांची विशेष उपस्थिती होती. तसेच, डॉ. अंजली साबणे, उप आरोग्य प्रमुख व डॉ. सुनिल तोरे, सहा.आरोग्य प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. ज्यांचे स्मरणार्थ जागतिक परिचारिका दिन साजरा केला जातो त्या फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचे कार्याबाबत मा. श्री. राजेंद्र जगताप यांनी उपस्थितांना माहिती दिली. तदनंतर डॉ. एस.टी.परदेशी यांनी या वर्षीचे सुरक्षित मातृत्व दिनाकरिता सर्व परिचारिकांना शुभेच्छा दिल्या. तसेच, पुणे मनपाचे सर्व दवाखान्यांमध्ये नव्याने उपलब्ध करण्यात आलेल्या ई.सी.जी.मशिन्स, ग्लूकोमिटर यांचे वापराबाबत सर्व परिचारिकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात असल्याचे घोषित करुन रुग्णांचे सेवेकरिता सदैव तत्पर राहण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना दिल्या. डॉ. क्षोत्री यांनी गरोदर मातांच्या करावयाच्या तपासण्या, घ्यावयाची काळजी व प्रसुतिदरम्यान उद्‌भवणाऱ्या अडचणींवर कशा प्रकारे मात करावी याबाबत विशेष मार्गदर्शन केले. या वेळी डॉ. क्षोत्री यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभत असल्याचे परिचारिकांनी नमूद केले. डॉ. साबणे यांनी सर्व परिचारिकांना शुभेच्छा देवून, सुरक्षित मातृत्व दिन कशा प्रकारे अधिक यशस्वीरित्या राबविता येईल याबाबत मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदर कार्यक्रमास सुमारे २५० परिचारिका उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्रीमती डिखळे, मेट्रन, श्रीमती बगाडे, मेट्रन, श्रीमती रजनी बनसोडे, श्रीमती तनुजा रावळ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती श्रध्दा गायकवाड यांनी केले.

# श्री. सुनिल हनवते यांच्या "तुझ्या आठवणीत" या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

पुणे महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले प्रशालेतील सिनिअर ग्रेड लेखनिक श्री. सुनिल हनवते यांचा कविता संग्रह तुझ्या आठवणीत याचे प्रकाशन स्वरगंधार संगित व साहित्य प्रसार संस्थेतर्फे जेष्ठ कवि मा.श्री.रमण रणदिवे यांच्या हस्ते दिनांक १५/५/१३ रोजी करण्यात आले.



सदर प्रकाशन कार्यक्रमास जेष्ठ कवि मा. श्री. म.भा.चव्हाण, शाहू महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभा इंगवले, पुणे महानगरपालिकेचे कामगार कल्याण अधिकारी मा. नितीन केंजळे, डॉ.गरुड, प्राचार्य श्री.स.ना.डांगे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

स्वरगंधार या संस्थेतर्फे नवोदित कवि/लेखक यांच्या पुस्तकांचे प्रकाशन केले जात असल्याबाबत स्वरगंधार संस्थेचे अध्यक्ष श्री. गोपाळ कांबळे व कार्याध्यक्ष श्री. सागर गायकवाड यांनी नमूद करुन संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.

श्री.हनवते यांनी केलेल्या कवितांचे उपस्थित कवि व मान्यवरांनी कौतुक करुन श्री. हनवते यांनी यापुढेही अशाच प्रकारे आणखी कविता कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

# ओळख प्राणिसंग्रहालयाची - मोफत उन्हाळी शिबीर

पुणे मनपा राजीव गांधी प्राणिसंग्रहालय व वन्यजीव संशोधन केंद्रामार्फत २२ मे जागतिक जैवविविधता दिनानिमित्त राजीव गांधी प्राणिसंग्रहालय, कात्रज येथे मोफत उन्हाळी शिबीराचे आयोजन करण्यात आले. जनसामान्यांमध्ये वन्य प्राणी व पर्यावरण विषयक जागृती व आवड निर्माण करण्यासाठी वेळोवेळी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. शिक्षणातून संवर्धन या उद्देशाची परिपूर्ती होण्यासाठी प्राणिसंग्रहालय सातत्याने प्रयत्नशील असते. या तीन दिवसीय उन्हाळी शिबीरामुळे वन्यप्राण्यांविषयक माहिती समाजामध्ये पोहचविणे व पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याची बांधिलकी समजविण्याचा प्रयत्न केला गेला.

ओळख प्राणिसंग्रहालया ची या उन्हाळी शिबिरामध्ये वेगवेगळ्या तज्ञांमार्फत विद्यार्थ्यांना प्राणिसंग्रहालय व्यवस्थापन, जैवविविधतेचे विविध घटक जसे की पक्षी, सरपटणारे व सस्तन प्राणी, वन्यजीव संरक्षणाच्या कायदेशीर बाबी, इत्यादीची माहिती देण्यात आली. तसेच, प्रात्यक्षिक व खेळांच्या माध्यमातून वाघाच्या पंज्यांचे ठसे घेण्यासाठी प्लॅस्टर कास्टींग करणे, पक्षांची घरटी, फिडर बनविणे, नर्सरी विकसित करणे, इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात आले.

# मनाची समता हीच खरी समता

तुम्ही स्वत:च स्वत:चे मालक आहात. जगातील कोणतीही गोष्ट तुमच्यावर अधिकार गाजवू शकत नाही. आयुष्याने जे जे तुम्हाला दिले आहे ते सर्व तुम्ही हसतमुखाने स्विकारु शकता. हे समजणे हाच मनाचा खरा समतोल आहे.

मनाची खरी समता म्हणजे काही नकारात्मक किंवा निष्क्रिय अलिप्तता नव्हे. संसारातल्या समस्यांपासून पळून जाण्यासाठी व आपले तोंड लपविण्यासाठी विरोध न करता अंधपणे स्विकारलेली गोष्ट म्हणजे मनाची समता नाही.

तर उलट आयुष्यातील सर्व समस्यांची, सत्याच्या सर्व पातळीवरुन पूर्ण जाणीव ठेवून जगाशी सामना करुन टिकणारी मनाची समता हीच खरी समता आहे.

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖

# कामगार दिंडीचे जाहिर आवाहन

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी सोमवार दिनांक १/७/२०१३ रोजी आळंदीहून पुण्यामध्ये मुक्कामी येणार आहे. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही कामगार कल्याण निधींतर्गत कामगार दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

कामगार कल्याण निधीच्या सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, ज्या सभासदांना कामगार दिंडीत सहभागी व्हावयाचे आहे त्यांनी मनपा मुख्य भवन येथील प्रांगणात सकाळी ६ पर्यंत उपस्थित रहावे.

तसेच, ज्या सभासदांना दिंडीमध्ये सार्वजनिक स्वच्छता, समाजप्रबोधनपर काही घोषणा सुचवावयाच्या असतील त्यांनी तशी लेखी घोषणा श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर, सरलेखनिक यांचेकडे जमा करावी.

# अल्पपरिचय

## कुसुमाग्रज (१९१२-१९९९)

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म नाशिक जिल्ह्यात झाला.मराठीत दुसरे ज्ञानपीठ पारितोषिक त्यांना मिळाले. विशाखा, किनारा, मुक्तायन, पाथेय हे कवितासंग्रह तसेच नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला, दूरचे दिवे ही नाटके, वैष्णव, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. मडगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. त्यांच्या अनेक कलाकृतींना मानसन्मान लाभले.

# १ मे - जागतिक कामगार दिन

मोलाने मजुरी करणाऱ्या वर्गास कामगार वर्ग असे म्हणतात. जे मोलाने मजूर कामाला लावतात त्यांना भांडवलदार वर्ग असे म्हणतात. भांडवलदारांच्या हाती सामाजिक उत्पादनाच्या साधनांची मालकी असते. कामगार वर्गाच्या हाती उत्पादनाची साधने नसतात. त्यामुळे उपजीविकेसाठी त्यांना आपले श्रम भांडवलदारांना विकावे लागतात. कामगार आणि भांडवलदार यांच्यामधील हे वरवर दिसणारे संबंध भ्रामक असतात. खरे तर त्यांच्या परस्पर संबंधात विषमता दडलेली असते. त्यामुळे पिळले जाणारे कामगार आणि त्यांना पिळणारे मालक, भांडवलदार यांच्यातील कलह ही एक अटळ गोष्ट होवून बसली आहे. त्यामुळे या दोन वर्गात जागतिक पातळीवर संघर्ष आढळून येतो.कामगार कल्याणाच्या हेतूने सुरु झालेल्या जागतिक कामगार दिनाचे महत्व समजून घेणे उचित ठरेल.

सन १९६४ साली सूत काढण्याच्या यंत्राचा शोध लागला. येथूनच भारतीय औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कारखानदारी उत्पादन करण्याला चालना मिळाली. समाजात कामगार आणि भांडवलदार हे दोन मुख्य वर्ग निर्माण झाले. प्रथम जेथे या औद्योगिक क्रांतीची सुरवात झाली ते इंग्लंड जगातील मुख्य भांडवलदारी औद्योगिक राष्ट्र बनले. इंग्लंड सोडून बाकीच्या युरोपात औद्योगिक क्रांती उशिरा सुरु झाली. भांडवलदारी पिळवणुकीबरोबरच त्याचा

**सौ.अलका जोशी**

प्रतिकार करणारा कामगार वर्ग निर्माण झाला. कामगारांना पाठिंबा देणाऱ्या संघटना जन्मास येवू लागल्या. भांडवलदार वर्गाने संघटनाविरोधी कायदे करुन जबाब दिला. कामगारांनी संप करुन प्रत्युत्तर देण्यास प्रारंभ केला. संघर्ष वाढू लागला.

सन १८८६ साली कामगार वर्गाने अमेरिकेत एक जोरदार चळवळ निर्माण केली.आठ तासांच्या दिवसासाठी ही चळवळ सुरु झाली. त्यामुळे १ मे रोजी साऱ्या देशभर संप सुरु झाला. शिकागो येथे कामगारांची मोठी मिरवणूक निघाली. या मिरवणूकीवर गोळीबार करण्यात आला. अनेक कामगारांना ठार करण्यात आले. या घटनेच्या निषेधार्थ ४ मे रोजी हे मार्केट येथे प्रचंड निदर्शन झाले. निदर्शन करणाऱ्या कामगारांवर पुन्हा गोळीबार करण्यात आला. त्यात सहाजण ठार व २०० जखमी झाले. शेकडोंना पकडण्यात आले. आठ जणांवर खटले भरुन पाचजणांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. यापैकी एकजण तुरुंगात मेला. हे जगळेजण खरे तर निरपराधी होते. जे घटनास्थळी हजर नव्हते त्यांनाही ठार करण्यात आले होते. फाशीच्या तक्त्यावरुन कामगारांनी भांडवलदार वर्गाला खणखणीत इशारा दिला की, आमचा गळा घोटता? एक दिवस असा येईल की, तुम्ही दाबलेल्या आमच्या आवाजपेक्षा आमचे मौनसुध्दा अधिक शक्तिशाली बनेल. फासावर गेलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी पाच लाखांवर लोक रस्त्यावर आले होते. या घटनेने जगातील कामगार चळवळीच्या क्षेत्रात १ मे दिन साजरा करण्याची परंपरा सुरु झाली. १४ जुलै १८८९ रोजी पॅरिस येथील कॉंग्रेसने १ मे हा दिन आंतरराष्ट्रीय कामगार ऐक्याचा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. १८९० मध्ये युरोपच्या सर्व देशात आणि अमेरिकेतही १ मे दिन पाळला गेला.

दुसरे महायुध्द नुकतेच संपले होते. अनेक देश उध्वस्त झाले हेते. तरीही१९४५ मध्ये ५६ देशांतील ६ कोटी कामगारांचे ३४६ प्रतिनिधी पॅरिस येथील जागतिक संघटनेच्या परिषदेला उपस्थित राहिले.नव्या शांततामय व श्रमाधारित जगाची निर्मिती करण्याच्या हेतूनेच ही परिषद घेण्यात आली. दिनांक ३ ऑक्टोबर १९४५ रोजी नव्या संघटनेची स्थापना करण्यात आली.

जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनची स्थापना हा कामगारांच्या एकजुटीसाठी सतत संघर्ष करणाऱ्या शक्तींचा विजय आहे. यामध्ये १३८ राष्ट्रातील २१ कोटी कामगार संघटित झाले आहेत. वर्णभेद, जागतिक शांतता, अण्वस्त्र विनाश, नि:शस्त्रीकरण आणि नवी जागतिक संघटना एकत्र आली

कामगार वर्गाची एक सबल संघटना या नात्याने जागतिक ट्रेड युनियन फेडरेशन सबंध कामगार वर्गाच्या युध्दाविरोधी शांततामय जग निर्माण करण्याच्या आकांक्षा व्यक्त करते. कामगार वर्गाने सतत सर्व युध्दविरोधी शक्ती एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. विशेषत: शस्त्रास्त्र स्पर्धेवर होणाऱ्या खर्चाला विरोध केला आहे. हा खर्च जगाच्या विकासासाठी करावा असा आग्रह धरला आहे. भूक व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी हा खर्च व्हावा अशी मागणी केली आहे. कामगारांपुढील प्रश्न सर्वच कामगारांच्या जिव्हाळ्याचे आहेत या गोष्टींवर ही संस्था सतत भर देत असते. भारतातील कामगार केवळ भारतीय कामगारांची एकजूट करण्यासाठीच एकत्र येत नसून आंतरराष्ट्रीय बंधुत्वाच्या साखळीतील एक दुवा ते आज निर्माण करीत आहेत.

साक्षात परमेश्वर सुध्दा कष्ट करणाऱ्या श्रमजीवी वर्गाच्या पाठीशी उभा राहतो. तो याप्रमाणे -

नसे राउळी वा नसे मंदिरी
जिथे राबती हात तेथे हरी
जिथे काम तेथे उभा शाम आहे
नव्हे धर्म रे कर्म ते रुप आहे
असे विश्वकर्मा श्रमाचा पुजारी
जिथे राबती हात तेथे हरी


## कल्याणवार्ता

मे, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/१२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## हे माहित आहे काय?

आपल्याला अनेक प्रसिध्द व्यक्तींची संपूर्ण नावे माहित नसतात. अशा काही प्रसिध्द व्यक्तींची संपूर्ण नावे तुमच्या माहितीसाठी..

| | |
|---|---|
| संत तुकाराम | : तुकाराम बोल्होबा अंबिले |
| संत नामदेव | : नामदेव दामाजी रेळेकर |
| संत ज्ञानेश्वर | : ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी |
| गाडगे महाराज | : डेबुजी झिंगराजी जानोरकर |
| समर्थ रामदास | : नारायण सुर्याजी ठोसर |
| राजर्षि शाहू महाराज | : यशवंतराव जयसिंगराव घाटगे |
| स्वामी विवेकानंद | : नरेंद्र विश्वनाथ दत्त |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | : विनायक दामोदर सावरकर |
| दादासाहेब फाळके | : धुंडीराज गोविंद फाळके |
| व्ही.शांताराम | : शांताराम राजाराम वणकुद्रे |
| सानेगुरुजी | : पांडुरंग सदाशिव साने |
| बालगंधर्व | : नारायण श्रीपाद राजहंस |

## विवेकानंदांचे उपदेश

१. या जगातील समस्त दु:खाचे कारण म्हणजे दुर्बलता हेच होय. आपण शक्तीहीन आहोत म्हणूनच आपल्याला दु:ख भोगावे लागते. दुर्बलतेमुळेच आपण खोटे बोलतो, चोरी करतो, हत्या करतो व इतर गुन्हे करतो. दुर्बलतेमुळेच आपण दु:खाच्या खाईत पडतो. आपण दुर्बल आहोत म्हणूनच आपण मृत्युमुखी पडतो. जिथे दुर्बल बनवणारी गोष्टच नाही तिथे मृत्यु कुठचा, दु:ख कुठचे?

२. बल हीच एकमात्र आवश्यक गोष्ट होय. बल हेच भवरोगाचे एकमात्र औषध होय. श्रीमंतांच्या द्वारे चिरडल्या जाणाऱ्या गरीब लोकांसाठी बल हेच एकमात्र औषध आहे, विद्वानांच्याद्वारे भरडल्या जाणाऱ्या लोकांसाठी बल हेच एकमात्र औषध आहे आणि अन्य पापी व्यक्तींचा ज्यांच्यावर जुलुम होतो अशा पापी लोकांसाठी देखील बल हेच एकमात्र औषध आहे.

३. उठा, धीट बना, शक्तीसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरावर घ्या आणि जाणून असा की तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात. तुम्हाला हवे असलेले सर्व सहाय्य व सर्व बल तुमच्यामध्येच आहे. म्हणून तुम्हीच तुमच्या स्वत:चे भवितव्य घडवा.

## देव

दगडातून देव बनविण्याचा
प्रयत्न मी केला.
ना दगडातील देव
जागृत झाला.
ना सगुण आकार
दगडाला आला.

दगडात देव असतो
हे श्रध्देने मानायला हवे.
एकांतात ध्यानात बसून
जाणायला हवे.

ठाव लागल्यावर जाणवतं
देव आपल्यातही आहे.
शरीर मन बुध्दी यांनी केलेला
व्यवहार तटस्थपणे पाहे.

नेहमी सूरालाच साथ
दिली पाहिजे.
आत्मविश्वास अन विवेकाने
असुरी विचारांवर मात केली पाहिजे.

सर्वांना विदुरा सारखे
वागता येईल काय ?
सर्वांच्याच घरी मग देव
ठेवेल पाय.

**सुनिल हनवते,**
**सिनिअर ग्रेड लेखनिक,**
**सावित्रीबाई फुले प्रशाला**

## गुणवंत पाल्यांचा सत्कार

कामगार कल्याण निधीतर्फे

सभासद सेवकांच्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षांमध्ये ७५% किंवा त्यापेक्षा जादा गुण प्राप्त केलेल्या गुणवंत पाल्यांचा सत्कार माहे जुलै २०१३ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. सबब, निधीच्या सर्व सभासद सेवकांनी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे दिनांक ६/७/२०१३ पर्यंत साक्षांकित गुणपत्रिका व माहे एप्रिल, २०१३ मधील कामगार कल्याण निधी कपातीच्या वेतन पावतीसह मा.खातेप्रमुखांच्या मार्फत अर्ज करावा किंवा आवश्यक वाटल्यास जादा माहितीसाठी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे संपर्क साधावा.

## वाचकांसाठी...

❖ खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
❖ आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
❖ अभिप्राय व सूचना द्या.
❖ नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.